E:\LANDSE~1\Vikas\Information reg Identified area.doc

# उपवनसंरक्षक, पुणे वन विभाग, पुणे यांचे कार्यालय, सेनापती बापट मार्ग, पुणे-४११ ००४.

विषय- सर्वोच्च न्यायालय याचिका क्र. २०२/९५ व १७१/९६ मधील दि. १२.१२.१९९६ चे निर्णयानुसार वन या संज्ञेत आयडेंटीफाय केलेल्या क्षेत्राची सविस्तर यादी ई-मेलद्वारे सादर करणेबाबत. तसेच वन या संज्ञेत येणाऱ्या क्षेत्राबाबत संबंधीत जमीनधारकास द्यावयाचे सुचना पत्राबाबत.

क्रमांक कक्ष-३/जमीन/ १०९२ /२००६-२००७

पुणे ४११ ००४, दिनांक २०/ ६/२००६

प्रति,

मा. जिल्हाधिकारी,
पुणे

संदर्भ- १ या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-३/जमीन/४७७२ दि.१९-३-०५ व १०६ दि.१४-४-०५ व १०६१ दि. २-७-०५.
२ आपले कडील पत्र क्र. पमफ/वशी/४७६७ दिनांक ३/५/२००५.

महोदय,

विषयांकित प्रकरणी उपरोक्त संदर्भानुसार पुणे जिल्ह्यातील आयडेंन्टीफाईड क्षेत्रा संबंधी माहिती संदर्भ क्र.२ अन्वये उपवनसंरक्षक, जुन्नर यांना उपलब्ध करून दिलेली प्रत प्राप्त झाली असून, सदर क्षेत्राची पडताळणी या कार्यालयात उपलब्ध असलेल्या अभिलेख्याची तपासणी करून खालील प्रमाणे सादर केली आहे.

| अ. क्र. | वनविभाग पुणे | गांवाचे नांव | आयडेन्टीफाईड क्षेत्राचा सर्व्हे क्रमांक | आयडेंन्टीफाईड क्षेत्र (हे) | शेरा | | | जमीन मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | मॅग्रुव्ह | शासकीय | खाजगी | |
| १. | पुणेशहर | लुल्लानगर | -- | ४०.०० | - | - | - | |
| २. | | डेक्कन कॉलेज-येरवडा | २४ | ३४.०० | - | - | सदर क्षेत्र खाजगी आहे. | |
| ३. | | पर्वती | ९५ | २.४१ | - | शासकीय | - | |
| ४. | | वानवडी | ५६ पैकी<br>४३ अ पैकी<br>४४ पैकी<br>४७ पैकी<br>५० पैकी<br>५१ पैकी | १५.९५ | - | - | खाजगी | |
| | | | एकुण | ९२.३६ | | | | |
| १. | हवेली | लोहगाव | -- | १६.०० | - | - | - | |
| २. | | चिखली | -- | १७.००<br>१५.००<br>३५.०० | | | | |
| ३. | | लोणीकंद | -- | २५.०० | | | | |
| ४. | | भावडी | -- | १७.०० | | | | |
| ५. | | पेरणे | -- | ९२.०० | | | | |
| ६. | | मांगडेवाडी | -- | २५.०० | | | | |
| | | | एकुण | २४३.९२ | | | | |

आपलेकडून प्राप्त झालेल्या यादीतील क्षेत्रामध्ये तफावत असल्याचे आढळून आले आहे. उदा. पुणे शहरातील चार गावामधील क्षेत्र ९७.९५ हे. दर्शविलेले आहे. परंतु चारही गावांच्या क्षेत्राची बेरीज केली असता ९२.३६ हे. क्षेत्र येते. तसेच हवेली तालुक्यातील ६ गावांच्या क्षेत्राची बेरीज केली असता २४३.९२ हे. क्षेत्र येत आहे. त्यामुळे क्षेत्राच्या ह्या आकडेवारीतील तफावत असुन सदर माहिती तपासून याबाबत खात्री करुन अचूक माहिती या कार्यालयास पाठवावी.

पुणे शहरातील मौजे पर्वती येथील स.नं. ९५ क्षेत्र २.४१ हेक्टर हरित पुणे प्रकल्पाअंतर्गत वनीकरणासाठी महसूल विभागाकडून घेण्यांत आलेले होते. सदरचे क्षेत्र संरक्षित वनांत गठीत करण्यासाठी वनजमाबंदी, कार्यालय भोर यांचे कडील पत्र क्र. वजब/काबि/७९०/दिनांक ३१/३/१९९२ अन्वये प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यामुळे सदरचे क्षेत्र हे या यादीतून वगळणे क्रमप्राप्त ठरते.

महसूल विभागाने कळविल्या प्रमाणे हवेली, जुन्नर, आंबेगाव व पुणे शहर वगळता अन्य तहसील मधील वन जमीन म्हणून अधिसुचित न झालेल्या शासकीय किंवा खाजगी वन सदृश्य जमीनी अढळून आल्या नाहीत. हे विधान तर्कसंगत वाटत नाही. कारण मावळ, मुळशी, वेल्हा, इंदापूर, बारामती, दौंड या तालुक्यामध्ये वनसदृश्य जमीनी खाजगी तथा शासकीय वर्गवारीमध्ये असण्याची शक्यता नाकारता येत नाही. या संदर्भात मुख्य वनसंरक्षक, (संधारण)म.रा.नागपूर यांनी त्यांचेकडील पत्र क्र.कक्ष-१२/जमीन/३/१३३/दि.३-५-०६ अन्वये कळविले आहे की, यापुर्वी दिलेल्या माहिती व्यतिरिक्त, क्षेत्र येत असल्यास याबाबत जिल्हास्तरीय समितीमार्फत पडताळणी करुन घ्यावी व समितीचा पुरक अहवालसादर करावा. तरी कृपया याबाबत या कार्यालयाचे पत्र क्र.अ/कक्ष-३/ जमीन/ ४७७२/ दिनांक १९/३/२००५ चे अवलोकन होणेस विनंती व त्यानुसार कृपया या कार्यालयास अवगत करावे ही विनंती.

संदर्भ क्र.२ अन्वये कळविलेल्या आयडेंटीफाय क्षेत्राच्या जमीन मालकाचे नाव कळवावे म्हणजे पुढील कार्यवाही करणे शक्य होईल.

शिघ्र कार्यवाहीच्या अपेक्षेने सत्वर कळविण्यात यावे ही विनंती.

उप-वनसंरक्षक
पुणे वन विभाग, पुणे.

प्रतिलिपि -

१.मुख्य वनसंरक्षक, (प्रा.) पुणे त्यांचेकडील पत्र क्र.कक्ष-३/जमीन/१०६१ दि.२-७-०५ अन्वये माहितीसाठी सविनय सादर.

२.वनसंरक्षक, भुमि अभिलेख कक्ष, म.रा.नागपूर यांना माहितीसाठी सविनय सादर.

उप वनसंरक्षक
पुणे वन विभाग, पुणे.